# राजर्षि छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माणगांव परिषद

**प्रा. राजरतन जाधव,** राज्यशास्त्र विभागप्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर

---

**सारांश**

१९३९ साली कोल्हापुरात भरलेल्या दलित रयत परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, "माझ्या सार्वजनिक आयुष्याचा श्रीगणेशा कै. छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माणगाव परिषदेत मी गिरविला होता" ही गोष्ट येथे नमूद करणे आवश्यक आहे. यावरून हे स्पष्ट होते की, २१-२२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर संस्थानातील माणगावला शाहू महाराजांच्या प्रेरणेने आणि डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण माराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद झाली. तीच आंबेडकरी चळवळीची तसेच डॉ.आंबेडकरांच्या सार्वजिनक जीवनाची मुहूर्तमेढ रोवणारी पहिली जाहीर सभा ठरते. त्यामुळे सामाजिक चळवळीच्या इतिहासात या परिषदेला अनन्य साधारण महत्व आहे.अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी प्रामाणिकपणे झटणारे कृतिशील सुधारक शाहू छत्रपती या परिषदेला जातीने उपस्थित होते. म. फुले यांचा सत्यशोधक वारस शाहू महाराज आणि म. फुले यांना गुरु मानणारे डॉ. आंबेडकर या परिषदेच्या निमित्ताने एका व्यासपीठावर आले होते. त्यामुळे समाजक्रांतीच्या चळवळीच्या दृष्टीने माणगाव परिषदेला ऐतिहासिक महत्व आहे

कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे २० मार्च १९२० रोजी राजर्षि छ.शाहू महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. बाबासाहेब आंबेंडकर यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृशांची ऐतिहासिक परिषद झाली. या परिषदे मध्येच शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकर यांचेकडे अस्पृश्य वर्गाच्या मुक्ती चळवळीचे नेतृत्व सोपविले होते आणि येथूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याला सुरवात झाली. शाहू महाराजांच्या समकालीन सामाजिक जीवन विषमतेने ग्रस्त झालेले होते. जाती संस्थेचे फायदे समाजातील फक्त विरिष्ठ जातीतील लोकांनाच मिळत होते. बहुजन समाज त्यापासून वंचित होता. स्त्रियांची स्थिती दयनीय होती. अस्पृश्य जातींना अनेक बंधनांचे पालन करुन जगावे लागत होते. धार्मिक जीवनात कर्मकांड, अंधश्रध्दा आणि पुरोहितांचे श्रेष्ठत्व याला विशेष प्राधान्य होते. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सुत्रे आपल्या हाती घेतली. त्यांचा मुळचा पिंड सुधारकाचा होता. तो वारसा त्यांना त्यांच्या वडिलांच्याकडूनच मिळाला होता. साहजिकच ही सर्व परिस्थिती बदलून समाजामध्ये सुधारणा घडवून आणाव्यात हे राजर्षिंच्या मनाने घेतले. यात भर पडली होती ती वेदोक्त प्रकरणाची. वेदोक्त प्रकरणाने शाहूछत्रपतींचा स्वाभिमानच दुखावला. राज्य सत्तेपेक्षा धर्मसत्ता ही समाजावर कशी वर्चस्वगाजवते याची प्रचिती महाराजांना आली. राजाला जर अशी वागणूक तर सामान्य जनतेला कशी वागणूक मिळत असेल हे महाराजांच्या लक्षात आले. येथूनच शाहू महाराजांच्या क्रांतीकारी सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली. त्यांनी आपल्या संरथांनात अनेक सुधारणा घडवून आणल्या.निरनिराळे कायदे केले.अस्पृशता नष्ट करणारा कायदा केला, मागासवर्गीयांना ५० टक्के राखीव जागाठेवण्यात आल्या. ही भारताच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना होती. शाहूमहाराजांनी अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्याचा विडाच उचलला होता.त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी सामाजिक परिषदा भरविल्या. माणगांव परिषदही त्यापैकी एक होय. या परिषदेचे वेगळे महत्व असे की, राजर्षि शाहू महाराजांनीच दलित वर्गाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व बहाल केले.

तत्कालीन समाजात शाहू महाराजांबरोबर इतर समाज सुधारकही अस्पृश्यता निवारण्याचे कार्य करत होते. परंतु अस्पृश्यांना त्यांच्याच हाडामासाचा नेतां लाभल्याशिवाय ख-या अर्थने अस्पृश्यांची मुक्ती चळवळ जोमाने उभी रहाणारनाही असे शाहू महाराजांना वाटत होते. अशा वेळी डॉ.भिमराव आंबेडकर यांच्याशी त्यांची ओळख झाली. आंबेडकर त्यावेळी शिक्षण घेत होते.महाराजांनीच त्यांना पुढील शिक्षणासाठी मदत देऊ केली होती. त्यांची हुषारी व बुध्दीमत्ता ते जाणुन होते. नंतरच्या काळात म्हणजे सन १९१९ मध्ये डॉ.आंबेडकरांनी साऊथ ब्युरो कमिशनपुढे साक्ष दिली. त्याचा परिणाम शाहूछत्रपतींच्यावर झाला. मुंबई कॉन्सिलमधील डॉ.आंबेडकरांच्या भाषणाने शाहू महाराज प्रभावित झाले. आणि येथुनच बहिकृत वर्गाच्या मुक्ती चळवळीच्या अग्रणी पदाचा मान डॉ. आंबेडकरांना देण्याचा निश्चय शाहू महाराजांनी केला.हजारो वर्षे मूक असणा-या समाजाला वाचा फोडण्याचा शाह महाराजांच्या मदतीने बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक नावांचे साप्ताहिकसुरु केले आणि ते ख-या अर्थाने मुकनायक बनले.

२० मार्च १९२० रोजी करवीर सस्थानातील माणगांव येथे अस्पृश्यांची पहिली परिषद भरली. अस्पृशांमार्फत शाहू महाराजांनी या परिषदेचे आयोजन केले होते. दत्तोबा पोवार, डॉ. रमाकांत कांबळे, गंगाराम कांबळे, गणेशाचार्य शिवराम कांबळे, तुकाराम जाधव, दादासाहेब शिर्के, पंजावराव हुलस्वार आदिप्रमुख कार्यकर्ते या परिषदेच्या तयारीमध्ये गुंतले होते.

परिषदेचे वैशिष्टय म्हणजे यामध्ये अस्पृश्य वर्गाबरोबरच स्पृश्य वर्गाचे कार्यकर्तेही सामील झाले होते.माणगांवचे जेष्ठ नागरिक आप्पासाहेब दादगोंडा पाटील हे या परिषदेचे स्वागत अध्यक्ष होते तर या परिषदेला प्रमुख वक्ते म्हणुन मुंबईचे बॅरिस्टर तल्यारखान हे पारशी विचारवंत, ब्राम्हणतेतर पक्षाचे भास्करराव जाधव आणि आण्णासाहेब लठ्ठे उपस्थित होते. २० मार्च रोजी पहाटे डॉ.आंबेडकरांचे आगमन झाले. त्यांना मिरवणुकीने सभास्थानी आणण्यात आले. शाहू महाराजांच्या जयजयकाराने सारामंडप दुमदुमून गेला. स्वागताध्यक्ष आप्पासाहेब पाटील यांनी स्वागतपर भाषण केल्यानंतर छ. शाहू महाराजांनी ऐतिहासिक असे भाषण केले.भाषणाच्या सुरवातीलाच त्यांनी आंबेडकरांना मित्र असे संबोधिले. त्यांचे अभिनंदन केले.अस्पृश्य लोकांची हजेरी आपण का माफ केली याचे अतिशय भावपूर्ण शब्दात कथन केले. तसेच वेठविरळा कमी करता येत नाही याबदल खंतही व्यक्त केली.

महाराजं पुढे म्हणाले,"आत्तापर्यंत आम्ही निकृष्ट अवस्थेत पोहचण्याचे कारण म्हणजे आम्ही आमचा योग्य पुढारी योजुन काढत नाही, गोड बोलून नावलौकिक मिळविण्याचे हेतूने आमच्या पैकी कांही स्वार्थी मंडळी अयोग्य पुढारी नेमुनअज्ञानी लोकांना फसवितात, पशुपक्षी देखील आपल्या जातीचाच. पुढारी करतात,ज्यांचे प्रमाण हजारात एक सुध्दा नसून ते मागासलेल्या लोकांना अस्पृश्य मानतात आणि स्पर्श झाला म्हणून शुध्दी करुन घेतात असे पुढारी काय कामाचे? असा सवाल करुन राजर्षि पुढे म्हणाले, मी लौकरच सेल्फ गव्हर्न्मेंट देणार आहे. त्याचा फायदा सर्वांनाच मिळावा म्हणून कम्युनल रि-प्रेझेंटेशन मी देणार आहे. अस्पृश्यांना बरोबरीने वागविल्याशिवाय राजकारण आणि देशकार्य होणार नाही. "आपल्या भाषणाच्या शेवटी शाहू महाराजांनीडॉ. आंबेडकरांना आपल्या कॅम्पवर भोजनाला येण्याची विनंती केली आणि भाषणाचा समारोप केला.

शाहू छत्रपतींचे उपरोक्त भाषण म्हणजे अस्पृश्यांच्या मुक्ती चळवळीची नांदीच ठरली. त्यांनी महाराष्ट्र व कर्नाटक येथील हजारो अस्पृश्यांच्या साक्षीने डॉ. आंबेडकरांच्या गळयात अस्पृश्यांच्या नेतेपदाची माळ घातली आणि आंबेडकरांनीही पुढे ती सार्थ करुन दाखविली.या परिषदेमध्ये बॅरिस्टरतल्यारखान व भास्करराव जाधव यांचीही भाषणे झाली.या ऐतिहासिक परिषदेमध्ये महत्वाचे १५ ठराव करण्यात आले.

१. महायुध्दात ब्रिटीश सरकारला व दोस्त राष्ट्राना जय मिळाल्याबध्दल परिषद आनंद व्यक्त करत आहे.

२. छ.शाहू महाराजांनी बहिष्कृत वर्गाला समानतेचे हक्क देऊन त्यांचाउध्दार करण्याचे सत्कार्य आरंभिले आहे याबध्दल महाराजांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने आपला सण म्हणुन साजरा करावा.

३. जे राजे आणि महाराजे सामाजिक बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीसाठी प्रयत्नकरत आहेत त्यांचे ही परिषद मनःपूर्वक आभार मानते.

४. जन्मसिध्द अयोग्यता व जन्मसिध्द अपवित्रता यामुळे हिन्दुस्थानातील सामाजिक परिस्थिती बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीस प्रतिकूल आहे. सबब बहिष्कृत लोक हे हिंदी साम्राज्याचे घटक असून त्यांनाही खालील मानवी हक्क आहेत.

अ. सार्वजनिक रस्ते, विहीर, तलाव, शाळा, धर्मशाळा, भोजनगृहे इत्यादी सार्वजनिक ठिकाणांचा उपभोग घेण्याचा अस्पृश्यांना हक्क आहे.

ब.गुणसिध्द योग्यतेने अस्पृश्य वर्गालाही व्यापार करण्याचा,व्यवसाय करण्याचा व नोकरी मिळविण्याचा हक्क आहे.

५.प्राथमिक शिक्षण मुला मुलींना भेद न करता जितक्या लवकर होईल तितक्या लवकर सक्तीचे व मोफत करण्यात यावे.

६.बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार होणे जरुरीचे आहे, त्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही, म्हणुन शिक्षण आणि अधिकारी वर्गात बहिष्कृतवर्गाची माणसे असावीत.

७. ज्याप्रमाणे मुसलमान आणि ब्राम्हणेतर वर्गाला शिष्यवृत्या दिल्या जात आहेत त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या मिळाव्यात अशी या परिषदेची विनंती आहे.

८. सर्वत्र स्पृश्य व अस्पृशांच्या शाळा या एकत्र असाव्यात असे या परिषदेचे मत आहे.

९.दरेक महार वतनदारास पूरेशी पैदास होत नसल्यामुळे त्याची स्थिती कंगाल झाली आहे. त्यामुळे वतन पध्दतीत फेरफार करणे जरुरीचे आहे, असे ही परिषद मानते.

१०. मेलेल्या जनावराचे मांस कोणत्याही जातीच्या माणसाने खाणे हा गुन्हा आहे, असे कायद्याने मानले जावे असा अभिप्राय ही परिषद व्यक्त करते.

११. तलाठयाच्या जागांवर बहिष्कृत वर्गाच्या, नेमणुका व्हाव्यात अशी यापरिषदेची मागणी आहे.

१२. बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीसाठी ज्या संस्था आणि सरकार प्रयत्न करीत आहेत ते सर्व प्रयत्न बहिष्कृत वर्गास सर्वस्वी मान्य आहेत, असे सरकारने समजु नये.

१३. भावी कायदेमंडळात बहिष्कृत वर्गाचे प्रतिनिधीत्व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निवडणुन घेण्यात यावेत अशी या परिषदेची मागणी आहे.

१४. ही परिषद भरवून आणण्याचे कामी ज्यांनी परिश्रम घेतले त्यांचे व विशेषतः आप्पासाहेब दादगोंडा पाटील यांचे ही परिषद आभार मानते.

१५. वरील सर्व ठराव संबंधित अधिका-यांकडे पाठविण्यासाठी परिषदेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सर्व अधिकार देत आहे.

याच परिषदेत शाहू महाराजांनी एक ऐतिहासिक भविष्यवाणी केली, की तरुण भिमराव आबेडकर हे फक्त दलीतांचेच नव्हे तर अखिल हिंदुस्थानाचे पुढारी होतीलयाची मला खात्री आहे. शेवटी डॉ. आंबेडकरांचे अध्यक्षीय भाषण होवून माणगांव परिषदेची सांगता झाली. पुढील काळात शाहु महाराजांनी नागपूर, दिल्ली येथेही परिषदा भरविल्या. मात्र, माणगांव परिषदेने महाराष्ट्राच्या भूमीत समतेचे बीज रुजविण्याचा प्रयत्न केला. डॉ.आंबेडकरांच्या कर्तत्वाचा प्रवास ख-या अर्थाने २० मार्च १९२० पासून सुरु झाला आणि उत्तरोत्तर दिग्वीजय करीत ६ डिसेंबर१९५६ ला संपला. म्हणून आंबेडकरी चळवळीमध्ये माणगांव परिषदेचे महत्व अनन्यसाधारण आहे.

**संदर्भ**

१) सुखाडे विजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे, भाग पहिला (१९२०-९६) लोकवाङ्मयगृह, मुंबई.

२) डॉ. भोसले एस. एस., क्रांतीसूक्ते: राजर्षि छत्रपती शाहू- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३) कीर धनंजय, राजर्षि शाहू महाराज, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई.

४) डॉ. पवार जयसिंगराव, राजर्षि शाहू छत्रपती जीवन व कार्य, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.